तरुण भारत

# शेतकरी बनले रेशीम उद्योगाचे मास्टर ट्रेनर

अहिल्या परकाळे
कोल्हापूर

रेशीम शेती करणाऱ्या शेतकऱ्यांच्या कौशल्याला शास्त्राची जोड शिवाजी विद्यापीठ देत आहे. शेतीतून थेट विद्यापीठातील बेंचवर बसून १९९ शेतकऱ्यांनी रेशीम उद्योगाचे शिक्षण घेतले आहे. हेच शेतकरी आता रेशीम उद्योगाचे मास्टर ट्रेनर झाले आहेत. सध्या १९९ शेतकऱ्यांशी शिक्षण पूर्ण केले आहे. हे प्रशिक्षित शेतकरी आपल्या परिसरातील शेतकऱ्यांना मार्गदर्शन करीत असल्याने कोल्हापूर जिल्ह्यातील रेशीम शेतीकऱ्यांच्या उत्पादनात लाखोंच्या पटीत वाढ झाली आहे. शेतीविषयक अभ्यासक्रम तयार करणारे राज्यातील एकमेव अकृषी विद्यापीठ म्हणून शिवाजी विद्यापीठाची ओळख आहे.

कोल्हापुरातील ५०० शेतकरी ४०० एकर जमिनीत रेशीम शेती करतात. हे शेतकरी रेशीम विक्रीसाठी बेंगलुर, कर्नाटक, आंध्रप्रदेश येथील बाजारपेठेत गेल्यानंतर त्यांच्या मालाला योग्य दर मिळत नव्हता. या शेतकऱ्यांच्या कष्टाला शास्त्राची जोड देण्यासाठी शिवाजी विद्यापीठातील प्राणीशास्त्र विभागाने २०१७–१८ या शैक्षणिक वर्षापासून रेशीमशास्त्र पदविका व पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरू केला आहे. चार वर्षात १९९ शेतकऱ्यांनी पदवी घेतली आहे. तर सध्या ४० विद्यार्थी अभ्यास करीत आहेत. कोल्हापूर जिल्ह्यातील ७० वर्षाच्या अजोबांनी रेशीमशास्त्र डिप्लोमाला प्रवेश घेतला आहे. प्रशिक्षित शेतकऱ्यांच्या रेशीम शेतीची उत्पादकता व गुणवत्ता वाढल्याने ५० हजार ते १ लाखांपर्यंत त्यांच्या उत्पन्नात वाढ झाली आहे. याचे 'नॅक' पियर कमिटीने विशेष कौतुक केले. तसेच प्राणीशास्त्र विभागाच्या विस्तारास मान्यता दिली आहे. हीच या शेतकऱ्यांनी घेतलेल्या शिक्षणाची पोहोचपावती म्हणावी लागेल.

- शिवाजी विद्यापीठातील प्राणीशास्त्र विभागातून १९९ शेतकऱ्यांनी घेतले प्रशिक्षण
- प्राणीशास्त्र विस्तार वाढीसाठी 'नॅक'ची मान्यता

## नाबार्ड करणार शेतकऱ्यांच्या शिक्षणाचा खर्च



रेशीम संचालनालयाचे प्रादेशिक संचालक महेंद्र ढवळे यांनी रेशीम संचालनालय व शिवाजी विद्यापीठ यांच्यात सामंजस्य करार केला आहे. जिल्हा नियोजन समितीने प्रशिक्षणासाठी १ कोटी ३४ लाख रुपयांचा निधी दिला आहे. नाबार्डने शेतकऱ्यांच्या सहा महिन्याच्या शिक्षणाचा खर्च करणार आहे.

**डॉ. ए. डी. जाधव (समन्वयक, रेशीमशास्त्र पदविका व पदव्युत्तर अभ्यासक्रम, शिवाजी विद्यापीठ)**

## तांत्रिक पदांसाठी शैक्षणिक अर्हता

विद्यापीठाच्या या अभ्यासक्रमाचे राज्य शासन मत्स व्यवसाय आयुक्त अतुल पाटणे यांनी कौतुक केले. तांत्रिक पदांच्या भरतीसाठी रेशीमशास्त्र पदविका व पदव्युत्तर या शैक्षणिक अर्हतेला मान्यता दिली आहे. या निर्णयाची अम्मलबजावणी नागपूर रेशीम संचनालयाने केली आहे. त्यामुळे कृषी व रेशीम संचालनालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनीही या अभ्यासक्रमाला पसंदी दिली आहे.

लोकमत

# न्यू कॉलेजमध्ये उद्या तपासणी शिबिर

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्यावतीने बिंदूनामावलीची प्राथमिक तपासणी करून घेण्यासाठी उद्या, गुरुवारी न्यू कॉलेजमध्ये सकाळी १० ते ५ या वेळेत तपासणी शिबिर आयोजित केले असल्याचे प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील यांनी कळवले आहे. कोल्हापूरसह सांगली, सातारा या जिल्ह्यांतील सर्व संलग्नित अनुदानित महाविद्यालयांतील शिक्षकांनी योग्य कागदपत्रांसह आणि लसीचे दोन डोस घेतल्याच्या कागदपत्रांसह उपस्थित राहावे.

सकाळ

# विद्यापीठ आंतरविभागीय कबड्डी स्पर्धा आजपासून

इचलकरंजी, ता. ७ : नाईट कॉलेजतर्फे शिवाजी विद्यापीठाच्या आंतरविभागीय पुरुषांच्या कबड्डी स्पर्धेचे आयोजन केले आहे. उद्या (ता. ८) व गुरुवारी (ता. ९) या स्पर्धा जयहिंद मंडळाच्या मैदानावर घेण्यात येणार आहेत. स्पर्धेतून अमरावती येथे होणाऱ्या 'पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ स्पर्धा', मेरठ (उत्तर प्रदेश) येथे होणाऱ्या 'अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्पर्धा', तसेच जैन युनिव्हर्सिटी बंगळूर येथे होणाऱ्या 'खेलो इंडिया युनिव्हर्सिटी गेम' व नागपूर येथे होणाऱ्या 'अश्वमेघ क्रीडा स्पर्धा यासाठी शिवाजी विद्यापीठाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या खेळाडूंची निवड केली जाणार आहे.

स्पर्धेसाठी सांगली, सातारा, कोल्हापूर या तीन जिल्ह्यांतील पहिल्या चार क्रमांकाचे १२ संघ सहभागी होणार आहेत. स्पर्धेत १९ सामने होणार आहेत. स्पर्धा दिवस-रात्र अशा दोन सत्रात प्रो-कबड्डी नियमानुसार मॅटवर होणार आहेत. स्पर्धेसाठी इलेक्ट्रिक स्कोअर बोर्डचा वापर केला जाणार आहे. स्पर्धेचे उद्‌घाटन उद्या सकाळी दहाला होणार असल्याची माहिती प्राचार्य डॉ. पुरंधर नारे यांनी दिली.

08 DEC 2021

महासत्ता

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# महापरिनिर्वाण दिनानिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन



कोल्हापूर, ता.६ (प्रतिनिधी)-

विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त आज कोल्हापूर शहर आणि जिल्ह्यातील विविध पक्ष, संघटना, विद्यार्थी-विद्यार्थ्यांनींनी तसेच नागरिकांनी भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास तसेच प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले.

कोरोनाच्या ओमीक्रॉन व्हेरियंटच्या पार्श्वभूमीवर कोरोनाचे नियम पाळून येथील बिंदू चौकातील तसेच महानगरपालिकेजवळील विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास नागरिकांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. सकाळपासूनच बिंदू चौक येथे नागरिकांची वर्दळ होती. मात्र प्रशासनाच्या सूचनाचे पालन करून आज कोणतीही मिरवणूक अथवा सभा न घेता सामाजिक अंतराचे पालन करीत अभिवादनाचा सोहळा पार पाडला. सामाजिक न्याय विभागाच्यावतीने समाज कल्याणचे सहाय्यक आयुक्त विशाल लोंढे यांनी मान्यवरांसह बिंदू चौकातील विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी माजी महापौर निलोफर आजरेकर, बाळासाहेब भोसले, उत्तमराव कांबळे, प्रा.शहाजी कांबळे, दगडू भास्कर, . भंडारी, दीपक पोलादे यांच्यासह विविध पक्ष, संघटनांचे पदाधिकारी, कार्यकर्ते, मान्यवर, लोकप्रतिनिधी तसेच नागरिक उपस्थित होते

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मृतींना शिवाजी विद्यापीठात अभिवादन**

शिवाजी विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्राच्या वतीने महापरिनिर्वाण दिनानिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यात आले. विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना समजून घेण्यात भारतीय समाज कमी पडला, म्हणूनच देशाची प्रगती खुंटली, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. प्रकाश कुंभार यांनी यावेळी बोलताना केले

**महानगरपालिकेच्यावतीने अभिवादन**

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त महानगरपालिकेच्यावतीने डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुर्णाकृती पुतळ्यास प्रशासक डॉ.कादंबरी बलकवडे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.यावेळी अतिरिक्त आयुक्त नितीन देसाई, उपआयुक्त रविकांत आडसूळ, शिल्पा दरेकर तसेच कर्मचारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कळंबा येथील शिक्षण शास्त्र अध्यापक शिक्षणसंस्था कोल्हापूर संचालित वसंतराव नाईक शिक्षणशास्त्र महाविद्यालयात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजीराव पाटील यांच्या हस्ते डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण अभिवादन करण्यात आले.कोल्हापूर (जिल्हा) बौध्द- अवशेष व विचार संवर्धन समितीच्यावतीने आज डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादन करण्यात आले. समितीचे अध्यक्ष टी. एस. कांबळे यांच्यासह मान्यवरांनी डॉ. आंबेडकर यांच्या बिंदू चौकातील पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

अखिल महाराष्ट्र कामगार व कर्मचारी संघाच्यावतीने भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून जिल्हा अध्यक्ष संजय गुदगे, महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्षा फरजाना नदाफ यांच्या हस्ते डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. परिवर्तन फौंडेशनच्यावतीने ही डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त अध्यक्ष अमोल कुरणे, निवृत्त पोलीस उपअधिक्षक आर.आर.पाटील यांच्यासह मान्यवरांनी डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

महासत्ता एकच आवृत्ती

08 DEC 2021

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# गोडबोले यांचे योगदान महत्त्वपूर्ण

**कोल्हापूर, ता.६ (प्रतिनिधी)**

पश्चिम महाराष्ट्रातील विकासाच्या प्रक्रियेत ग्रामीण बँकिंगमधील रा. ना. गोडबोले यांचे योगदान महत्त्वपूर्ण आहे असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाच्या वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता प्रा. डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी केले.

रा. ना. गोडबोले यांच्या १०७ व्या जयंतीनिमित्त युनायटेड वेस्टर्न बँकेच्या रा.ना. गोडबोले अध्यासनाच्यावतीने आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

महासत्ता एकच आवृत्ती

08 DEC 2021

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# नववास्तववादी चित्रपटांची देशात परंपरा

## डॉ.अनमोल कोठाडिया

**कोल्हापूर,ता.५(प्रतिनिधी)-**

.................................

भारतात १९५२ साली भरलेल्या पहिल्या आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवापासून (इफ्फी) नववास्तववादी चित्रपटांची परंपरा आहे. ही परंपरा पुढे घेऊन जाण्यास गोव्यातील 'इफ्फी'ची मदत होत आहे, असे प्रतिपादन जेष्ठ चित्रपट अभ्यासक डॉ. अनमोल कोठाडिया यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या पद्मश्री डॉ. ग.गो. जाधव पत्रकारिता अध्यासनाच्यावतीने आयोजित 'इफ्फी आणि चित्रपट चळवळ' या विषयावर ते बोलत होते. अध्यक्षस्थानी अध्यासनाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव होते. यावेळी इफ्फीच्या ७५ क्रिएटिव्ह माईंड्समध्ये निवड झालेला एम.ए.मास कम्युनिकेशनचा विद्यार्थी सोमदत्त देसाई याचा डॉ. कोठाडिया यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

डॉ.कोठाडिया म्हणाले, भारतीय चित्रपट चळवळीला मोठी परंपरा आहे. इफ्फीमुळे ही परंपरा पुढे जात आहे. १९५२ मध्ये त्यावेळच्या महोत्सवात दाखवलेल्या 'बायसिकल थिव्ज'या चित्रपटाने एक नवा वास्तववादी दृष्टीकोन दिला. त्यानंतरच्या काळात नव वास्तववादी चित्रपटांची मांडणी होऊ लागली. सध्याच्या इफ्फीला समजून घेताना हा इतिहास समजून घ्यावा लागेल.

गोव्यातील महोत्सवाने जगाकडे पाहण्याची नवी दृष्टी दिली. जगातील चित्रपट, विषय, मांडणी आणि वेगवेगळे प्रयोग अनुभवाने शक्य झाले. भारतीय चित्रपटातील वेगळेपणही या निमित्ताने अधोरेखित होत आहे, असे ते म्हणाले. सोमदत्त देसाई यानेही यावेळी विद्यार्थ्यांशी संवाद साधला.

पंचवटी DOLBY DIGITAL PLUS 7.1 शुक्र